# मेट्रो ३ मार्गासाठी भू-तांत्रिक सर्वेक्षण सुरू

## पुनर्वसन आराखडा अंतिम झाल्यानंतरच स्थानकाचे काम

मुंबई, ता. २५ : कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो ३ मार्गाच्या कामासाठी कंत्राटदाराकडून संपूर्ण मार्गिकेमध्ये भू-तांत्रिक चाचणी, इमारतींच्या स्थितीचे सर्वेक्षण करण्यात येत आहे. ही कामे डिसेंबरपर्यंत चालणार आहेत. या प्रकल्पाचा पुनर्वसन आराखडा अंतिम होऊन त्यावर सहमती झाल्याशिवाय मेट्रो स्थानकांचे बांधकाम करता येणार नसल्याचे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी स्पष्ट केले आहे.

मेट्रो ३ मार्गाचे भू-तांत्रिक सर्वेक्षण सुरू असून त्यासाठी लागणाऱ्या सर्व आवश्यक परवानग्या महापालिका आणि वाहतूक पोलिसांकडून घेण्यात आल्या आहेत. मेट्रो ३ ची काळबादेवी व गिरगाव स्थानके पॅकेज २ मध्ये येतात. या पॅकेजमध्ये भूमिगत बोगद्याचे काम आझाद मैदानपासून सुरू होऊन मुंबई सेंट्रलपर्यंत चालणार आहे. याचा काळबादेवी व गिरगाव परिसराला कोणतीही बाधा पोहचणार नसल्याचा दावा कॉर्पोरेशनने केला आहे. कॉर्पोरेशनने या भागातील कमीत कमी इमारती बाधित व्हाव्यात; तसेच त्यांना त्याच ठिकाणी घरे देण्याचे नियोजन केले आहे. त्यानुसार सर्व इमारतींच्या स्थितीचे सर्वेक्षण करण्यात येत आहे.